# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५२-२२** **दिनांक २४/११/२०२२**

## मनी पॅलेस ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई

दिनांक २२.११.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाला विश्वसनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मनी पॅलेस ऑर्केस्ट्रा बार, पत्ता-निरज पार्क बिल्डींग, मॅक्डोनल्ड समोर, मिरा-भाईंदर रोड, नयानगर, मिरारोड पुर्व या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला वेटरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडून नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक/चालक, मॅनेजर, कॅशिअर, वादक, पुरुष सिंगर व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करुन नृत्य करुन घेत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोनि समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबीची पुर्तता करुन पंटर पाठवून सत्यता पडताळुन मनी पॅलेस ऑर्केस्ट्रा बार, पत्ता-निरज पार्क बिल्डींग, मॅक्डोनल्ड समोर, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पुर्व येथे दिनांक २२/१२/२०२२ रोजी २३.०५ वा. छापा टाकला असता मनी पॅलेस ऑर्केस्ट्रा बारमध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर नृत्य व अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे मालक, चालक/मॅनेजर, कॅशियर, वेटर, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान ७६,०३०/- रु रोख रक्कम व इतर मुद्देमालासह जप्त करुन नमुद बार आस्थापनेचे ०१ चालक/मॅनेजर, ०१ कॅशियर, ०७ वेटर, ०१ वादक व ०१ पुरुष सिंगर असे एकुण ११ इसमांना ताब्यात घेवुन पाहिजे आरोपी बार मालक त्याच्याविरुध्द पोशि/१२११८ केशव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.८३९/२०२२ महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष(बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. समीर अहिरराव, सपोउपनि. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर व मपोहवा/०३०१८ नम्रिता यादव नेम-मनुष्यवध तपास पथक यांनी केली आहे.

---ooo---